परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड वर्ष- 11 वे | अंक क्र 62 सोमवार दि. 16 मार्च 2026 पृष्ठे 4 किंमत 2 ₹ RNI: MAHMAR/2016/67060



# मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना यशस्वीपणे राबविणाऱ्यांचा जाहीर सत्कार करणार - आ. धनंजय मुंडे

## परळी मतदारसंघातील शेत/पाणंद रस्ते योजनेचा धनंजय मुंडे यांनी घेतला आढावा







परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना उत्पादित शेतीमालाला ताजी बाजारपेठ मिळवून देण्यासह स्थानिक दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेतून परळी मतदारसंघातील प्रत्येक शेत / पाणंद पक्क्या रस्त्याने जोडण्याचे आपले उद्दीष्ट असून, यासाठी मनरेगासह जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जास्तीत जास्त

**जास्तीत जास्त कामे प्रस्तावित करा, अतिक्रमणे आणि अपिलांची प्रकरणे सोडवण्यासाठी मिळून प्रयत्न करा - धनंजय मुंडे यांचे आवाहन**

कामे प्रस्तावित केली जावीत. या निधी बरोबरच विविध कंपन्यांच्या सीएसआर फंडातून देखील निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी प्रयत्नशील असून, ही योजना 100% यशस्वीपणे राबवणाऱ्या ग्रामपंचायती तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांचा आपण जाहीर सत्कार करणार असल्याची भावना माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी येथील एका बैठकीत बोलून दाखवली.

परळी वैजनाथ पान 3 वर

# 5 राज्यांच्या निवडणुकांचे बिगूल वाजले! निवडणूक आयोगाकडून तारखांची घोषणा



देशात पुन्हा एकदा निवडणुकांचे बिगूल वाजले असून आसाम, केरळ, पुदुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आह. केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेऊन निवडणूक कार्यक्रम जाहीर केलाय.

निवडणूक आयोगाचे अध्यक्ष गौतम कुमार यांनी माहिती दिली की, आसाम, केरळ, पुदुच्चेरी येथे 9 एप्रिल रोजी मतदान होईल. तर, तामिळनाडू येथे 23 एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडले. तसंच, पश्चिम बंगाल दोन टप्प्यात मतदान प्रक्रिय पार पडणार असून पहिल्या टप्प्यातील मतदान 23 एप्रिल आणि दुसऱ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया 29 एप्रिल रोजी होईल. या सर्व राज्यांची मतमोजणी 4 मे रोजी होणार आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि निवडणूक आयुक्त विवेक जोशी यांचा समावेश असलेल्या निवडणूक आयोगाने दुपारी 4 वाजता पत्रकार परिषद घेतली. या निवडणुकीत 824 मतदारसंघांमधील 2.18 लाख मतदान केंद्रांवर 17.4 कोटी मतदार सहभागी होतील, असे पान 3 वर

# आज ठळक

## कु.अवनी मोगरकरचे ऑलिम्पियाड परीक्षेत यश




परळी (प्रतिनिधी) परळी शहरातील गणेशपार भागातील ज्ञानबोधिनी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.अवनी अश्विन मोगरकर हीने ऑलिम्पियाड परिक्षेत सुवर्णपदक मिळवत यश संपादन केले आहे.कु.अवनी ही नगरसेविका सौ.जयश्री मोगरकर यांची नात आहे.

इयत्ता 1 ली ते 12 वीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या ऑलिपियाड स्पर्धात्मक परीक्षा आहेत.या परीक्षा गणित, विज्ञान,इंग्रजी आणि तर्कशक्ती यांसारख्या विषयांमधील विद्यार्थ्यांचे सखोल ज्ञान आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य तपासतात.विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण करणे आणि त्यांची बौद्धिक क्षमता वाढवणे,गणित,विज्ञान, इंग्रजी,कॉम्प्युटर आणि सामान्य ज्ञान ही ऑलिम्पियाड परीक्षेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांत आत्मविश्वास वाढतो, विश्लेषणात्मक कौशल्ये सुधारतात आणि भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी पाया तयार होतो.या ऑलिम्पियाड परिक्षेत ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयात इयत्ता पहिलीत शिकत असलेल्या कु.अवनी अश्विन मोगरकर हीने सुवर्णपदक मिळवत यश संपादन केले आहे. याबद्दल तिचे कौतुक होत आहे.

# शेतकऱ्यांसाठी मोठी खुशखबर! दिवसा 12 तास मोफत वीजपुरवठा


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुरी इथल्या महात्मा फुले कषी विद्यापीठाच्या 39 वा पदवीदान समारंभात शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याबाबत मोठी घोषणा केली.

'पुढील वर्षांपासून शेतकऱ्यांना दिवसा 12 तास मोफत वीज पुरवठा होईल, अशी महाराष्ट्र सरकार तयारी करत आहे,' असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केले.राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा 39वा पदवीदान समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पान 3 वर

# बारामतीची पोटनिवडणूक सुनेत्रा पवार लढवणार, सुनील तटकरे यांनी दिली माहिती



केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आज तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी या ठिकाणच्या विधानसभा निवडणुकांची घोषणा होणार आहे. या निवडणुकीसोबत महाराष्ट्रातील विधानसभेच्या रिक्त जागांवर पोटनिवडणूक जाहीर होऊ शकते. भाजपाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानं अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झालेली आहे. तर, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं 28 जानेवारीला झालेल्या विमान अपघातात निधन झालं. यामुळं बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त आहे. या दोन्ही जागांची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. 23 एप्रिलला ही पोटनिवडणूक पार पडणार आहे. सुनेत्रा पवार निवडणूक लढवतील अशी माहिती सुनील तटकरेंनी दिली.राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवारच बारामती विधानसभा पोटनिवडणूक लढणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी एबीपी माझाशी बोलताना दिली आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवार दिला जाणार नसल्याची माहिती आहे. 23 एप्रिलला ही पोटनिवडणूक पार पडणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली.बारामती आणि राहुरी येथील पोटनिवडणुकांची घोषणा पान 3 वर

# अखेर प्रतिक्षा संपली शेतकऱ्यांच्या खात्यात आले झटपट 2 हजार रुपये, केंद्राच्या त्या योजनेचा मोठा लाभ



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाममधून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा 22 वा हप्ता जाहीर केला आहे. या हप्त्याच्या माध्यमातून देशभरातील 9.32 कोटींपेक्षा जास्त शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात एकूण 18,640 कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट हस्तांतरित करण्यात आली आहे. प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या खात्यात 2,000 रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.पीएम किसान योजनेच्या 22 व्या हप्त्याची शेतकरी मोठ्या उत्सुकतेने वाट पाहत होते. अखेर हा हप्ता जाहीर झाल्यामुळे देशभरातील लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. या योजनेअंतर्गत केंद्र सरकार दरवर्षी पात्र शेतकऱ्यांना तीन हप्त्यांमध्ये आर्थिक मदत पान 3 वर

# पुढच्या हंगामात राज्यातील 50 टक्केच साखर कारखाने बंद होणार? शेतकरी येणार अडचणीत



सध्या जागतिक पातळीवर पेटलेल्या इराण-इस्त्रायल युद्धामुळे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय व्यापाराला त्याचा मोठा फटका बसल्याचं दिसून येत आहे. त्यात साखर उद्योगावरहीया युद्धाचा मोठा परिणाम झाला असल्याचं समोर येत आहे. ही युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यापासून केंद्र सरकारनं साखर कारखान्यांना निर्यातीसाठी दिलेल्या कोट्यानुसार होणारी साखर निर्यात ठप्प झाल्याचं समोर आल्यानं साखर कारखान्यांवर मोठं संकट उभं ठाकलं आहे.

एकीकडे इराण-इस्त्रायल युद्धामुळे समुद्री मार्गावरील वाहतूक आणि व्यापार विस्कळीत झाल्याचं चित्रं आहे. याचदरम्यान, महाराष्ट्र राज्यासह पान 3 वर

परळी संघर्षनेता
प्रतिनिधी नेमणे आहे
बीड,आष्टी,पाटोदा,गेवराई
अंबाजोगाई,केज,
सिरसाळा,धर्मापुरी
या तालुक्यात व गावात लोकप्रिय परळी संघर्षनेता या वर्तमान पत्रा करिता अनुभवी प्रतिनिधी नेमणे आहे.
-:त्वरित संपर्क करा:-
9881265102

# सौ.लिलादेवी द्वारकादासजी भंडारी यांचे दु:खद निधन



परळी प्रतिनिधी परळी शहरातील द्वारकादास भंडारी यांच्या धर्मपत्नी आणि संजय,महेंद्र,ईश्वर यांच्या आई सौ.लिलादेवी द्वारकादासजी भंडारी यांचे रविवार दि.15 मार्चला दु:खद निधन झाले.

माताजी सौ.लिलादेवी द्वारकादासजी भंडारी या सुस्वभावी, धार्मिक होत्या.त्यांच्या पार्थिव देहावर आज सोमवार दि. 16 मार्च पान 3 वर




# विविध विकास कामांचे 19 कोटी रुपयांचे कामांचे टेंडर रद्द करण्याच्या मागणीसाठी पत्रकार संघाचे आज अमरण उपोषण

## नव्याने टेंडर काढण्याची पत्रकार संघाची मागणी




परळी (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ शहरात यापूर्वी नगरोत्थान सुवर्ण जयंती शहरी विकास योजना अंतर्गत 110 कोटी रुपयांची अपूर्ण व निकृष्ट दर्जाची कामे करणा- या लातूर येथील श्रीनाथ इंजिनियर यांना परत एकदा परळी नगर परिषदेने डी.पी.डी.सी.20250-2026 अंतर्गत 19 कोटी रुपयांची विविध विकास कामांचे दिलेले टेंडर त्वरित रदद करावे या मागणीसाठी परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने उद्या 16 मार्च रोजी परळी नगर परिषद कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्यात येणार आहे.

याबाबत परळी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्रीनाथ इंजिनियर लातूर यांनी यापूर्वी नगरोत्थान पान 3 वर

# ‘अल्पसंख्याक’ आबादानी!

अल्पसंख्याकांचे लांगूलचालन करणारे सरकार’ हा आरोप 2014 नंतर देशात आणि 2015 नंतर राज्यात फार कमी होत असतो. राज्यातल्या सरकारची प्रतिमा बहुसंख्याकांचे हित जोपासणारे अशी झालेली आहे. मात्र याच सरकारने अल्पसंख्याक असा दर्जा शाळा तसेच संस्थांना देण्याच्या बाबतीत हात खूपच सैल सोडलेला दिसतो. का या प्रश्नामागची कारणे अनेक! त्यावर सविस्तर मत नोंदवले जाईलच. सर्वात आधी ही चर्चा सुरु कशी झाली त्याविषयी. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे सारे राज्य शोकसागरात बुडाले असताना अल्पसंख्याक दर्जाचे प्रकरण गाजले. त्या खात्याचे मंत्री असलेले दादा हयात नसताना असा दर्जा कुणी बहाल केला असा प्रश्न उपस्थित झाला व सरकारने लगेच या निर्णयाला स्थगिती दिली. असा दर्जा देण्याचे आदेश काढणार्या सहसचिवाची तातडीने बदली करण्यात आली. नंतर असे लक्षात आले की दादांनीच ही फाइल मंजूर केली होती व ऑनलाइन सेवा बंद असल्याने केवळ आदेश निघाले नव्हते. ते दादा गेल्यावर दुसर्या दिवशी निघाले. हा सर्वांना ठाऊक असलेला घटनाक्रम. मात्र यानिमित्ताने हे दर्जा प्रकरण नेमके काय याबाबत मिळणारी माहिती धक्कादायक आहे.

केंद्र सरकारने 1992 मध्ये लागू केलेल्या कायद्यानुसार मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी व जैन या धर्मातील लोकांनी काढलेल्या शिक्षण संस्थांना ‘अल्पसंख्याक’ असा दर्जा मिळतो. राज्याच्या पातळीवर या सहा धर्मांसह ‘भाषिक अल्पसंख्याक’ अशी श्रेणी जोडली गेली. यात हिंदी, कन्नड, मल्याळम, गुजराती, सिंधी, उर्दू, मारवाडी व गुजर भाषा बोलणारे संस्थाचालक समाविष्ट झाले. अल्पसंख्य या शब्दाची व्याख्या करायला गेले तर हेही योग्यच. केंद्राच्याच कायद्यानुसार अशा संस्थांना भरपूर अनुदान मिळते. त्या संस्थांच्या शाळा अनुदानित या व्याख्येत बसणार्या असल्या तर. शिवाय या संस्थांमधील प्राध्यापक व शिक्षक भरतीत सरकारला हस्तक्षेप करता येत नाही. म्हणजे ‘पवित्र पोर्टल’पासून सुटका. या संस्थांना गरीब मुलांच्या मोफत शिक्षणासाठी सरकारने केलेला ‘आरटीई (राइट टु एज्युकेशन) अॅक्ट’ हा कायदा लागू होत नाही. म्हणजे गरीब मुलांना शिकवण्यापासून मुक्ती. या संस्थांना असा दर्जा मिळवण्यासाठी अटी दोनच. त्यावर 50 टक्क्यांपेक्षा जास्त संचालक अल्पसंख्याक या कक्षेत येणारे असावेत व या शाळांमध्ये शिक्षण घेणारे 50 टक्के विद्यार्थी अल्पसंख्य प्रवर्गातून येणारे असावेत. यात कोणत्याही राजकारण्याने वा मंत्र्यांनी हस्तक्षेप करू नये म्हणून केंद्र सरकारने दर्जा मंजूर करण्याचे अधिकार अधिकार्यांच्याच हाती ठेवले. केंद्र व राज्यात सह किंवा उपसचिव दर्जाचा अधिकारी त्यासाठी प्राधिकृत करण्यात आला. किमान महाराष्ट्राचा विचार केला तर सुरुवातीला ही व्यवस्था उत्तमरीत्या कार्यरत होती. नंतर राज्यभरातील चाणाक्ष शिक्षणसम्राटांच्या लक्षात असे आले की संस्थेच्या कार्यकारिणीत 50 टक्के अल्पसंख्याक संचालकांचा भरणा केला तर सहज हा दर्जा मिळवता येऊ शकतो. चालबाजी सुरु झाली ती इथून. कार्यकारिणीवर अल्पसंख्य घेतले तर 50 टक्के अल्पसंख्य विद्यार्थी कुठून आणायचे हा मुद्दा यातला प्रमुख अडसर होता.

मग शिक्षणसम्राट कामाला लागले. त्यांनी अल्पसंख्याक मंत्रालयात संधान साधून एक नवा आदेश काढला. त्यात केंद्राने नमूद केलेली ही विद्यार्थ्यांची अटच वगळण्यात आली. त्यामुळे विद्यार्थी कुठून आणायचे हा प्रश्न आपसूकच मिटला. यानंतर असा दर्जा मिळवण्याचे प्रस्ताव शेकड्याने सरकारकडे सादर होऊ लागले. लगोलग ते मंजूरही होऊ लागले. महाराष्ट्रात 2009 या वर्षापासून आजतागायत सहा हजारांच्या आसपास संस्था अल्पसंख्य झाल्या. हा आकडा बघून अनेकांचे डोळे विस्फारतील. याचे कारण शिक्षण हक्कासाठी लागू केलेल्या आरटीईच्या अंमलबजावणीत दडले आहे. ती त्याच वर्षीपासून सुरु झाली. राज्यात खरोखर इतके अल्पसंख्य विद्यार्थी शिक्षण घेतात का असा प्रश्न कुणालाही पडावा. याचे उत्तर नाही असेच येते. मुळात राज्यातल्या अल्पसंख्याक खात्याला तुटपुंजा निधी मिळतो. या खात्याकडे फारसे काम नाही. त्यामुळे ते घ्यायला कुणी मंत्री तयार होत नाही. मात्र या संस्थांची यादी, त्यांना मिळणार्या सवलती बघून मंत्र्याचे डोळे विस्फारले. खर्या वादाला सुरुवात झाली ती इथून. अजितदादांच्या आधी हे खाते ज्या नाशिकच्या नेत्याकडे होते त्यांनी आदेश काढला. या दर्जाच्या फाइली माझ्या मंजुरीशिवाय मान्य करायच्या नाहीत म्हणून. तेव्हा कार्यरत असलेल्या सहसचिवांनी यावर आक्षेप घेतला. केंद्राचा आदेश दाखवला. मंत्र्यांना फाइल दाखवण्याची कुठलीही तरतूद नाही. तसे केले तर तो केंद्रीय कायद्याचा भंग ठरेल असे सांगितले. पण मंत्री ऐकायला तयार नव्हते. अखेर सहसचिवाची बदली झाली. त्याजागी दुसरे आले. त्यांचाही तसाच छळ सुरु झाला. पण योगायोग असा की गेल्या हिवाळी अधिवेशनाच्या काळात त्यांनी चक्क आत्महत्या केली. केवळ याच कारणासाठी या खात्यातले सात सहसचिव आजवर बदलले गेले. ऐकत नाही का मग करा बदली असा प्रकार सुरु झाला. नंतर या मंत्र्यालाच न्यायालयाच्या निर्णयामुळे घरी जावे लागले व शेवटी दादांकडे हे खाते आले. दादा खमके निघाले. त्यांनी सहसचिवांना पुन्हा अधिकार बहाल केले, फक्त अट एवढीच घातली की दर्जा बहाल करताना कुठलाही गैरव्यवहार करायचा नाही. कुणाकडूनही पैसे घ्यायचे नाहीत. सारी कागदपत्रे नीट बघायची. यातली गंमत अशी की या दर्जासाठी इच्छुक असलेल्या संस्था कागदपत्रे तयार करण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत. त्यांना करायचे काय असते तर संस्थेच्या कार्यकारिणीवर असलेल्या काहींना काढून अल्पसंख्याकांना घ्यायचे. विद्यार्थ्यांचा मुद्दा तर राज्य शासनानेच निकाली काढलेला.

# ‘देना’ प्रकरण : अमेरिका-इराण संघर्षात भारताच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह?

**लेखक : डॉ. भारत कऱ्हाड**



जागतिक राजकारणात समुद्रावर घडणाऱ्या लष्करी घटनांचे परिणाम अनेकदा केवळ युद्धनौका किंवा लष्करी कारवाईपुरते मर्यादित राहत नाहीत. अशा घटनांचे राजनैतिक, सामरिक आणि प्रतिमात्मक परिणामही दूरगामी असतात. अलीकडे चर्चेत आलेले इराणच्या ‘देना’ या युद्धनौकेचे प्रकरण हे त्याचेच एक उदाहरण मानले जाते. भारताच्या निमंत्रणावरून आयोजित करण्यात आलेल्या बहुराष्ट्रीय नाविक कवायतींमध्ये सहभागी झालेली ही युद्धनौका नंतर अमेरिकेकडून हल्ला झाल्याच्या वृत्तांमुळे उद्ध्वस्त झाल्याची बातमी समोर आल्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. विशेषतः भारताच्या प्रतिमेच्या आणि विश्वासार्हतेच्या संदर्भात या घटनेकडे पाहिले जात आहे.

भारतीय नौदल दर काही वर्षांनी बहुराष्ट्रीय नाविक कवायती आयोजित करत असते. या कवायतींचा मुख्य उद्देश विविध देशांच्या नौदलांमध्ये समन्वय वाढवणे, समुद्री सुरक्षा मजबूत करणे आणि परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करणे हा असतो. विशाखापट्टणम् येथे आयोजित करण्यात आलेल्या अशाच एका नाविक कवायतींसाठी विविध देशांच्या युद्धनौकांना निमंत्रण देण्यात आले होते. त्यात इराणची ‘देना’ ही युद्धनौकाही सहभागी झाली होती. भारताच्या दृष्टीने हा कार्यक्रम समुद्री कूटनीतीचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. कारण अशा कार्यक्रमांमुळे विविध देशांमध्ये सहकार्य आणि संवाद वाढतो.

कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर संबंधित युद्धनौका आपल्या-आपल्या देशाकडे परत निघाल्या. त्याच वेळी इराणची ‘देना’ ही युद्धनौका परतीच्या प्रवासात असताना तिच्यावर अमेरिकेकडून हल्ला झाल्याची माहिती आंतरराष्ट्रीय माध्यमांमधून समोर आली. ही घटना भारताच्या समुद्री हद्दीत नव्हे तर आंतरराष्ट्रीय समुद्रात घडल्याचे सांगितले जाते. तरीही या घटनेमुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले. विशेषतः भारताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या युद्धनौकेवर अशा प्रकारची कारवाई का झाली, हा मुद्दा चर्चेचा विषय ठरला.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर भारत-अमेरिका संरक्षण सहकार्याचा संदर्भही महत्त्वाचा ठरतो. गेल्या काही वर्षांत भारत आणि अमेरिका यांच्यात लष्करी सहकार्य मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. या सहकार्याचा पाया तीन महत्त्वाच्या करारांवर आधारित आहे—LEMOA, COMCASA आणि BECA. या करारांमुळे दोन्ही देशांमध्ये लष्करी माहितीची देवाणघेवाण, तांत्रिक सहकार्य आणि धोरणात्मक समन्वय वाढला आहे.

LEMOA (Logistics Exchange Memorandum of Agreement) हा करार 2016 मध्ये भारत आणि अमेरिका यांच्यात झाला. या करारामुळे दोन्ही देशांच्या सशस्त्र दलांना एकमेकांच्या लष्करी तळांचा मर्यादित वापर करता येतो. युद्धनौका किंवा लष्करी विमानांना इंधन भरणे, दुरुस्ती करणे किंवा आवश्यक रसद घेण्यासाठी दुसऱ्या देशाच्या तळावर थांबण्याची सुविधा या करारामुळे मिळते. हा कायमस्वरूपी तळ देणारा करार नसून परस्पर सहकार्याच्या तत्त्वावर आधारित आहे.

दुसरा महत्त्वाचा करार म्हणजे COMCASA (Communications Compatibility and Security Agreement). हा करार 2018 मध्ये करण्यात आला. या करारामुळे भारत आणि अमेरिका यांच्यात सुरक्षित आणि एन्क्रिप्टेड लष्करी संवाद प्रणालीचा वापर शक्य झाला. युद्धनौका, लष्करी विमाने आणि इतर लष्करी साधनांमध्ये सुरक्षित माहितीची देवाणघेवाण करणे या करारामुळे अधिक प्रभावी झाले आहे. संयुक्त लष्करी कवायती किंवा कारवायांमध्ये यामुळे समन्वय अधिक सुलभ होतो.

तिसरा करार म्हणजे BECA (Basic Exchange and Cooperation Agreement). हा करार 2020 मध्ये झाला. या करारामुळे दोन्ही देशांमध्ये भौगोलिक आणि उपग्रह आधारित माहितीची देवाणघेवाण करता येते. उपग्रह चित्रे, अचूक नकाशे आणि लक्ष्य निश्चितीशी संबंधित माहितीमुळे आधुनिक लष्करी कारवायांची अचूकता वाढते. या करारामुळे भारताच्या संरक्षण व्यवस्थेला तांत्रिक बळ मिळाले आहे.

या तीनही करारांमुळे भारत-अमेरिका संरक्षण सहकार्य अधिक मजबूत झाले आहे. त्यामुळे भारताने आयोजित केलेल्या नाविक कवायतींमध्ये कोणत्या देशांच्या युद्धनौका सहभागी आहेत याची माहिती अमेरिकेला नसणे अवघड मानले जाते. त्यामुळे ‘देना’ प्रकरणाच्या संदर्भात अनेक विश्लेषक प्रश्न उपस्थित करीत आहेत.




ही परिस्थिती अधिक स्पष्टपणे समजून घेण्यासाठी एक साधे उदाहरण पाहूया. समजा एखाद्या कॉलेजने क्रीडा स्पर्धा आयोजित केली आणि त्या स्पर्धेसाठी तालुक्यातील विविध कॉलेजांना निमंत्रण दिले. स्पर्धा व्यवस्थित पार पडली, विजेतेही ठरले आणि कार्यक्रम संपल्यानंतर सर्व विद्यार्थी आपल्या-आपल्या कॉलेजकडे परत निघाले. परंतु परतीच्या मार्गावर सार्वजनिक रस्त्यावर एका कॉलेजच्या विद्यार्थ्याला दुसऱ्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी अडवून मारहाण केली. अशा परिस्थितीत त्या मारहाणीची थेट जबाबदारी स्पर्धा आयोजित करणाऱ्या कॉलेजवर येत नाही. कारण घटना त्यांच्या परिसरात किंवा नियंत्रणाखाली घडलेली नसते. मुख्य जबाबदारी मारहाण करणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या संस्थेची ठरते.

याच धर्तीवर ‘देना’ प्रकरणाकडे पाहिले जाऊ शकते. भारताने नाविक कवायतींसाठी निमंत्रण दिले होते, परंतु हल्ला भारताच्या समुद्री हद्दीत किंवा भारताच्या नियंत्रणाखाली घडलेला नव्हता. त्यामुळे कायदेशीर दृष्टिकोनातून त्या घटनेची थेट जबाबदारी भारतावर येत नाही. तरीही आंतरराष्ट्रीय राजकारणात विश्वास आणि प्रतिमेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे अशा घटनांमुळे काही प्रमाणात राजनैतिक चर्चा निर्माण होणे स्वाभाविक आहे.

भारताची परराष्ट्र नीती परंपरेने संतुलित धोरणावर आधारित आहे. भारत अमेरिकेशी धोरणात्मक भागीदारी राखतो, तर दुसरीकडे इराणसारख्या देशांशी ऊर्जा, व्यापार आणि भूराजकीय संबंधही कायम ठेवतो. चाबहार बंदर प्रकल्पामुळे भारत-इराण संबंधांना वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताला अत्यंत सावध आणि संतुलित भूमिका घ्यावी लागते.

‘देना’ प्रकरणामुळे भारताच्या नौदल कूटनीतीपुढे काही महत्त्वाचे प्रश्न उभे राहतात. भविष्यात भारत विविध देशांना नाविक कवायतींसाठी निमंत्रित करतो तेव्हा त्या देशांना सुरक्षित आणि विश्वासार्ह वातावरण मिळेल का, हा प्रश्न विचारला जाऊ शकतो. आंतरराष्ट्रीय सहकार्याचे मूलभूत तत्त्व म्हणजे विश्वास. जर त्या विश्वासावर प्रश्न निर्माण झाले तर बहुपक्षीय सहकार्याच्या प्रयत्नांवर परिणाम होऊ शकतो.

त्याच वेळी भारताने आपली धोरणात्मक स्वायत्तता कायम ठेवणेही अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत कोणत्याही एका महासत्तेच्या प्रभावाखाली पूर्णपणे जाण्याऐवजी स्वतःच्या राष्ट्रीय हिताच्या आधारावर निर्णय घेण्याचा प्रयत्न करतो. ही भूमिका भारताला जागतिक राजकारणात स्वतंत्र आणि संतुलित शक्ती म्हणून ओळख मिळवून देते.

म्हणूनच ‘देना’ प्रकरण हे केवळ एका युद्धनौकेवरील हल्ल्याचे उदाहरण नाही. ते भारताच्या परराष्ट्र धोरण, सामरिक भागीदारी आणि आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेची कसोटी घेणारे प्रकरण आहे. महासत्तांच्या संघर्षाच्या या काळात भारतासारख्या उदयोन्मुख शक्तीने संतुलित, स्वतंत्र आणि विचारपूर्वक धोरण राखणे अत्यंत आवश्यक आहे. कारण आजच्या जागतिक व्यवस्थेत लष्करी शक्तीइतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय विश्वास आणि प्रतिमा. ‘देना’ प्रकरण हे त्याचीच आठवण करून देणारे एक महत्त्वाचे उदाहरण म्हणून निश्चितच चर्चेत राहील.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# “जो समाज विचार करतो, तोच समाज सक्षम ठरतो...!”

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त बौद्ध समाजातील युवक युवतींसाठी एकदिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्याचे आवाहन

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त बौद्ध समाजातील युवक-युवतींसाठी एकदिवसीय PERSONALITY DEVELOPMENT WORKSHOP चे आयोजन महाराष्ट्रातील जयंती उत्सव समित्या, विविध सामाजिक संस्था आणि संघटना यांनी करावे,असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती म्हणजे समाजात प्रचंड उत्साह, जोश आणि अभिमानाची लाट असते. हा जोश असलाच पाहिजे; कारण तो आपल्या इतिहासाचा, स्वाभिमानाचा आणि संघर्षाचा स्मरणदिन आहे. परंतु जोशासोबत होशही तितकाच आवश्यक आहे. जयंतीचा जल्लोष जितका महत्त्वाचा आहे, तितकेच तिच्या मागील विचारांचे चिंतन आणि कृतीही महत्त्वाची आहे.दरवर्षी जयंती येते, उत्साहात साजरी होते आणि निघून जाते. परंतु प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.जयंती साजरी करण्यामागील मूळ उद्देश काय आहे ?.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजासाठी नेमके कोणते स्वप्न पाहिले होते?.त्या स्वप्नाच्या दिशेने आपण खरंच चाललो आहोत का..?

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना एक सक्षम,सजग आणि स्वाभिमानी समाज उभा करायचा होता.शिक्षण, समाजकारण,अर्थकारण,सांस्कृतिक, धर्म आणि राजकारण या सर्व क्षेत्रांत आत्मविश्वासाने उभा राहिलेला समाज त्यांना पाहायचा होता.शासन, प्रशासन आणि न्यायपालिका या संविधानिक क्षेत्रांत आपल्या समाजातील युवक सर्वोच्च पदांवर विराजमान व्हावेत,अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती.परंतु त्यांच्या महान कार्यानंतर गेल्या 70 वर्षांत या क्षेत्रांत मोजकेच लोक यशस्वी झालेले दिसतात, आजही बहुतांश समाज अविकसित आहे.आपल्या समाजातील युवक किती प्रमाणात सर्वोच्च स्थानावर पोहोचले आहेत?.याचे आपण वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणार आहोत का ? जर आपण हे मूल्यमापन करण्याची प्रामाणिक तयारी दाखवणार नसू, तर स्वतःला “आंबेडकरवादी” म्हणवून घेण्यात अर्थ उरत नाही. त्या शब्दाला न्याय देण्यासाठी कृतीशीलतेची गरज आहे.

आज संपूर्ण महाराष्ट्रात जयंतीनिमित्त कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो. मिरवणुका,सजावट,ध्वनीव्यवस्था,सांस्कृतिक कार्यक्रम आणि जल्लोष यात मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. उत्सव हा नक्कीच असावा; परंतु त्या खर्चातून समाजातील पुढील पिढी घडविण्यासाठी किती कार्यक्रम राबविले जातात, हा गंभीर प्रश्न आहे.महाराष्ट्रात एकूण 36 जिल्हे, 355 तालुके आणि सुमारे 530 प्रमुख शहरे आहेत. या सर्व ठिकाणी भव्य पातळीवर भीम जयंती उत्सव साजरा केला जातो. त्यामध्ये सुमारे 885 मोठी भीम उत्सव मंडळे कार्यरत असल्याचे गृहीत धरले, आणि प्रत्येक मंडळाचा किमान खर्च 15 लाख रुपये मानला, तर केवळ या मोठ्या मंडळांवरच सुमारे 132 कोटी 75 लाख रुपये खर्च होतात. मध्यम आणि लहान मंडळांचा खर्च धरला, तर एकूण खर्च सहजपणे 500 कोटी रुपयांपर्यंत पोहोचतो.ही रक्कम समाजाच्या उत्कर्षासाठी किती मोठे सामर्थ्य ठरू शकते, याचा आपण कधी गंभीरपणे विचार केला आहे का.? जल्लोष आणि जयजयकार करतानाच या निधीचा काही भाग समाजातील युवक-युवतींच्या बौद्धिक आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी वापरला गेला, तर ती खरी बाबासाहेबांना अभिवादन करण्याची कृती ठरेल.याच विचारातून बौद्ध समाजातील युवक-युवतींसाठी एकदिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा आयोजित करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या कार्यशाळेचा उद्देश केवळ भाषण करणे नाही, तर युवकांना विचार करायला प्रवृत्त करणे, त्यांच्या क्षमतांना दिशा देणे आणि त्यांना भविष्यासाठी सक्षम बनवणे हा आहे.या कार्यशाळेमध्ये खालील प्रमुख विषयांवर सखोल आणि प्रात्यक्षिक स्वरुपात मार्गदर्शन केले जाईल.

1) आपल्या पूर्वजांची अवस्था,त्यांचा संघर्ष आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला महान सामाजिक महासंग्राम व त्याग

2) बौद्ध समाजातील युवक आणि युवतींसमोरील आजची आव्हाने कोणती आहेत ? आणि त्या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यासाठी कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत?

3) विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आणि आजचा युवा वर्ग

4) व्यक्तिमत्त्व विकास आणि बौद्ध युवा PERSONALITY DEVELOPMENT AND BUDDHIST YOUTH

5) ध्येय निश्चिती कशी करावी? - GOAL SETTING

6) नेतृत्व विकास -LEADERSHIP DEVELOPMENT

7) निर्णय क्षमता आणि आत्मविश्वास - DECISION POWER AND CONFIDENCE

8) भविष्यातील नियोजन-FUTURE PLANNING

9) आपण समाजासाठी काय केले पाहिजे.?

वयोगट - 16 ते 25,किमान 50 युवक आणि 50 युवती या सर्व विषयांवर सखोल विचारमंथन,प्रात्यक्षिक मार्गदर्शन आणि संवादात्मक पद्धतीने एकदिवसीय कार्यशाळा घेतली जाईल.युवक-युवतींनी स्वतःच्या क्षमतांचा विकास करून समाजासाठी सक्षम नेतृत्व कसे उभे करावे,याविषयी मार्गदर्शन केले जाईल.समाजातील पुढील पिढी सक्षम, जागरूक आणि विचारशील व्हावी,हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. जल्लोषाच्या पलीकडे जाऊन विचारांची ज्योत प्रज्वलित करण्याचा हा प्रयत्न आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क करा.किरण मोहिते- 9561883549 मोटिवेशनल ट्रेनर, व्याख्याते,मानसशास्त्र आणि संविधान अभ्यासक.**

**सागर तायडे यांस कडून**

# घाटनांदुर मध्ये महाराजस्व अभियान पाहिला टप्पा पार






महेंद्र गोदाम अंबाजोगाई प्रतिनिधी: अंबाजोगाई घाटनांदुर दि-14-03 येथे आई मंगल कार्यालय घाटनांदुर रेल्वे स्टेशन येथे कार्यक्रम पार पडला .छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानाचा मुख्य उद्देश असून नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेतला . महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवून त्यांच्या प्रलंबित समस्या तात्काळ सोडविणे हा छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानाचा मुख्य उद्देश असून नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेतला

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथे आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ करण्यात आले कार्यक्रम सुरु करण्याच्या आधी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. व ज्योत पेटवण्यात आली,आई मंगल कार्यालय या ठिकाणी शुभारंभ झाले नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.शुभारंभाच्या दिवशी विविध महसूल प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली. त्यामध्ये फेरफार , सातबारा दुरुस्ती ,उत्पन्नप्रमाणपत्र,रक्तदान शिबिर, डिजिटल सातबारा , नमुना 8-अ उतारे विविध प्रमाणपत्रे तसेच एकल खिडकी व्यवस्थेअंतर्गत राशन मध्ये नाव समाविष्ट करने_काडने ,बचत गट महिलांनाकर्ज वाटप,आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या कुटुंबास चेकच्या माध्यमातून मदत केली .यावेळी परळी मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे, अप्परजिल्हाधिकारीअश्विनी सोनवणे जिरंगे, दिपक वजाळे, उपविभागीय अधिकारी ,तहसीलदार विलास तरंगे,राजेश्वर आबा चव्हाण,शिवाजी शिरसाट,नेताजी देशमुख , गोविंद भैया देशमुख ,महबूब शेख,काशिनाथ कातकडे ,ज्ञानोबा जाधव ,बाळासाहेब देशमुख,दत्ता काका जाधव ,मुक्तार शेख,अजितदादा देशमुख मंडळ अधिकारी घुगे मॅडम तसेच ग्रामविकास अधिकारी महेश फड,सरपंच महेश गारठे, तलाठीफुलचंदशिरसाठ,पोलीसउपनिरीक्षक शिरसाट,उपनिरीक्षक शेप साहेब,कॉन्स्टेबल संभाजी सोळंके,कमलाकर मिसाळ,पत्रकार बांधव व प्रतिष्ठित नागरिक आदींची प्रमुख उपस्थिती होती. महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविणे, प्रलंबित प्रकरणे कमी करणे आणि प्रशासन व नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करणे या उद्देशाने हे अभियान जिल्हाभर प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.नागरिकांना विविध प्रमाणपत्रे व उतारे सुलभपणे उपलब्ध करून दिले तसेच काहींना राशन शिधापत्रिका ही वाटप करण्यात आल्या तसेच प्रशासन व नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करणे हा उद्देश आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने शिबिरांमध्ये सहभागी होऊन आपल्या समस्या मांडल्यात व या अभियानाचा लाभ घेतला .घाटनांदुर येथील आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या वतीने पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले.

# काटेवाडी गावच्या विकासासाठी महाराजस्व शिबीरामध्ये आमदार श्री प्रकाश ( दादा ) सोळंके यांना गावचे उप - सरपंच श्री माणीक ( दादा ) मुंडे यांनी दिले निवेदन

धारूर ( बाबुराव तिडके )




प्रदिर्घ स्वातंत्र्याच्या कालखंडानंतर काटेवाडी या गावाला स्वातंत्र्य ग्रामपंचायतचा दर्जा मिळाला गावच्या सरपंच पदाचा पहिला बहुमान कु अंजली रोहिदास गोरे या विद्याविभुषित कर्तत्ववान महिला रणरागिनिला मिळाला तर उप - सरपंच या पदाचा बहुमान गावचे प्रतिष्ठीत नागरिक श्री माणीक ( दादा ) मुंडे यांना मिळाला हे गाव विकासा पासुन कोसो दुर होते पण आता या गावाला विकासाचे दैदिप्यमान पर्व सुरु झालेले आहे अॅ श्री रोहिदास गोरे साहेब यांनी गावच्या विकासासाठी नविन पर्वाची गुडीच उभारलेली आहे तर गावचे उप - सरपंच श्री माणीक ( दादा ) मुंडे व श्री संजय गोरे यांनी काल झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर महसुल मंडळ तेलगाव या कार्यक्रमामध्ये आ सोळंके साहेब यांच्याकडे गावच्या विकासासाठी विविध प्रकारचे निवेदने दिली

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

विधानसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेतून प्रस्तावित कामांचा धनंजय मुंडे यांनी आज संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रमुख पदाधिकारी व विविध गावच्या सरपंच, उपसरपंच आदींच्या उपस्थितीत सविस्तर आढावा घेऊन व्यापक चर्चा केली.

शेत / पाणंद रस्त्यांच्या प्रस्तावित कामांमध्ये ज्या ठिकाणी अतिक्रमणे किंवा अपिल आहेत अशी प्रकरणे तातडीने सोडवावीत यासाठी एक विशेष कृती कार्यक्रम तयार करावा, तसेच अडचणीची अपिले किंवा अतिक्रमणे निकाली काढण्यासाठी आवश्यक तिथे आपणही स्थानिक ग्रामस्थांच्या मध्यस्थीने मदत करू, असेही धनंजय मुंडे या बैठकीत म्हणाले.

प्रत्येक गावातील कामे प्रस्तावित करताना संबंधित गावचे सरपंच तसेच प्रतिनिधींच्या सूचना विचारात घ्याव्यात अशा सूचनाही धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण, जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे, बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, शिवाजीराव शिरसाट, राजाभाऊ पोळ, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, प्र. तहसीलदार विलास तरंगे, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले यांसह विविध गावचे सरपंच, पदाधिकारी तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

----------------------------------------

सीईसीने सांगितले.16 मार्च रोजी निवडणूक कार्यक्रमाचे जाहिरात प्रसिद्ध केली जाईल. 23 मार्चपर्यंत उमेदवार आपले अर्ज दाखल करु शकतात. 24 मार्च रोजी अर्जांची छाननी केली जाईल. 26 मार्चपर्यंत उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. 9 एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडेल. तर, 4 मे रोजी मतमोजणी प्रक्रिया राबवली जाणार आहे.30 मार्च रोजी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असून 3 एप्रिलपर्यंत उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल करु शकतात. 7 एप्रिल रोजी उमेदवारांच्या अर्जांची छाननी केली जाईल. तर, 9 एप्रिल रोजी उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. तसंच, 23 एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाईल, तर 4 मे रोजी मतमोजणी केली जाणार आहे.2021 मध्ये पश्चिम बंगालमध्ये आठ टप्प्यांत मतदान प्रक्रिया झाली होती. मात्र, यावेळी दोनच टप्प्यांत मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यानुसार, पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी 30 मार्च रोजी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असून 6 एप्रिलपर्यंत उमेदवार उमेदवारी अर्ज भरु शकतात. तर, 7 एप्रिल रोजी उमेदवारांच्या अर्जांची छाननी केली जाईल. 9 एप्रिल रोजी उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. तसंच, 23 एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. तर, 4 मे रोजी मतमोजणी होणार आहे.दुसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी 2 एप्रिल रोजी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असून 9 एप्रिलपर्यंत उमेदवार अर्ज दाखल करु शकतात. 10 एप्रिल रोजी अर्जांची छाननी केली जाणार असून 13 एप्रिल रोजी उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. तर, 29 एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. तर, 4 मे रोजी मतमोजणी होणार आहे.

----------------------------------------

(Devendra Fadnavis) यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देवून सन्मानित करण्यात आलं. राज्यपाल जिष्णु देव वर्मा, कृषीमंत्री दत्ता भरणे, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आदी उपस्थित होते.इंटरनॅशनल सोरल अलायंस यांनी महाराष्ट्रातील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला,जगातील सर्वात मोठी वितरक सोलर योजना म्हणून मान्यता दिली. यातून 16 हजार मेगावॅट वीज तयार केली. शेतकरी (Farmer) कंपनी तयार केली असून, त्यामार्फत वीज वितरण सुरु असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.या वर्षाअखेर 14 हजार मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. आता राज्यातील सुमारे 65 टक्के शेतकऱ्यांना, दिवसा 12 तासांची वीज देणं सुरु केलं आहे. काही ठिकाणी दहा तास देत आहोत. या वर्षाच्या शेवटीनंतर, पुढच्या वर्षांपासून शेतकऱ्यांना, दिवसा 12 तास वीज, ती पण मोफत दिली जाईल,' अशी घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.'वातावरणातील बदलामुळे शेती उत्पन्नावर मोठा परिणाम होत आहे. वातावरणाचा परिमाण होणार नाही, असे वाण तयार करणे गरजेचे आहे. आपली माती खराब होणार नाही, यासाठी संशोधन गरजेचे आहे,' याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधलं.

------------------------------

झाली तर दोन्ही निवडणुका या बिनविरोध व्हाव्यात असा आमचा प्रयत्न असेल. पण आमच्यावर जर निवडणूक लादली गेली तर आम्हीही निवडणूक लढायला तयार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीची जागा रिक्त झाली आहे. त्यामुळे इथली पोटनिवडणूक आता 23 एप्रिलला पार पडणार आहे.

---------------------------------

देते.अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात 2,000 रुपयांची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. मात्र एकाच वेळी 9 कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करणे शक्य नसल्यामुळे काही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम पोहोचण्यासाठी थोडा वेळ लागू शकतो. त्यामुळे जर अजूनही पैसे जमा झाले नसतील तर थोडी प्रतीक्षा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाम राज्यातून या योजनेचा 22 वा हप्ता जाहीर केला. यापूर्वी 19 नोव्हेंबर 2025 रोजी त्यांनी तामिळनाडूमधून या योजनेचा 21 वा हप्ता जाहीर केला होता.

शेतकरी आपल्या खात्यात पैसे जमा झाले की नाही हे दोन प्रकारे तपासू शकतात. बँक खात्याचा बॅलन्स तपासून किंवा पीएम किसान योजनेच्या अधिकृत वेबसाइटवर जाऊन.

यासाठी शेतकऱ्यांनी PM Kisan Official Portal या अधिकृत संकेतस्थळावर जावे. त्यानंतर Know Your Status या पर्यायावर क्लिक करून आपला रजिस्ट्रेशन नंबर आणि कॅप्चा भरावा. त्यानंतर स्क्रीनवर आपल्या खात्याची माहिती दिसेल. यात आतापर्यंत मिळालेल्या हप्त्यांची माहिती तसेच 22 व्या हप्त्याची नोंद देखील पाहता येईल.

-------------------------

संपूर्ण देशभरातून निर्यात होणारी साखर अनेक बंदरांवर अडकून पडल्यानं साखर कारखान्यांना त्याचा मोठा फटका बसला आहे. तसेच साखरेच्या दरातील स्थिरता आणि एफआरपी (FRP) च्या वाढीमुळे राज्यातील साखर उद्योग मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे.महाराष्ट्र राज्यातील पुढील हंगामात 50 टक्के साखर कारखाने बंद पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुमारे 3 हजार कोटींचं नुकसान आणि 4 हजार 315 कोटींची एफआरपी थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. महत्त्वाची बाब 2019 पासून साखरेचे किमान विक्री मूल्य (MSP) ₹31 किलोवर स्थिर असून एफआरपी तब्बल सहावेळा वाढ करण्यात आली आहे. यामुळे साखर व्यवसाय कोलमडून पडल्याचं दिसून येत आहेराज्यात आगामी काळात उसाचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिकूल हवामानामुळे निम्म्या कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचं दिसून येत आहे. साखरेला उठाव नसून, बी-हेवी मोलॅसिस तयार करण्याची क्षमता असूनही राज्याला मर्यादित कोटा (20 टक्के) मिळाला आहे. तसेच निर्यात न झाल्याने गोदामात साखरेचा साठा वाढून देशांतर्गत दरात घसरण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याचाच मोठा आर्थिक फटका बसून कारखाने अडचणीत येण्याची दाट शक्यता आहे..देशातून परदेशात पाठवण्यात येत असलेला शेतमाल युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक बंदरे आणि समुद्रातील मार्गांवरच अडकून पडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे निर्यात प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असून याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत असल्याचं सांगितलं जात आहे. अशाचप्रकारे साखर निर्यात ठप्प राहिली, तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होण्याची शक्यता आहे.

-------------------------

रोजी सकाळी 9 वाजता निजी निवास ,विवेकानंद नगर, परळी वैजनाथ येथून अंत्ययात्रा निघणार असल्याचे शोकाकुल भंडारी परिवारा कडून कळविण्यात आले आहे.भंडारी परिवाराच्या दु:खात दै.परळी संघर्षनेता परिवार सहभागी आहे

------------------------

योजनेअंतर्गत असलेली 110 कोटी रुपयांची कामे पूर्ण केलेली नाहीत .शहरातील भुयारी गटाराचे चेंबर अनेक ठिकाणी रस्त्यावर उंच तर काही ठिकाणी खोल असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.अनेक नागरिकांना अपघातात गंभीर दुखापती झाल्या आहेत.विविध पक्ष व संघटना आणि नागरिकांनी अनेक तक्रारी केलेल्या आहेत.11 मार्च रोजी 19 कोटी रुपयांच्या कामांचे उद्घाटन करण्यात आले.सदरील कामे ही परळी शहराचे वाटोळे करणाऱ्या लातुरच्या श्रीनाथ इंजिनियर गुत्तेदारास देण्यात आली आहेत.

श्रीनाथ इंजिनियर लातूर यांचा यापूर्वी नगरोत्थान योजनेअंतर्गत कामातील परळीकरांना आलेला वाईट अनुभव लक्षात घेता सध्या काढण्यात आलेले 19 कोटी रुपयांची कामे टेंडर रद्द करून व चांगल्या दर्जाची कामे व्हावेत याकरिता परत टेंडर काढावे अशी मागणी ही पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनावर पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष रानबा गायकवाड, अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष धीरज जंगले, शहराध्यक्ष शेख मुकरम, उपाध्यक्ष बाबा शेख, आदी पत्रकारांच्या आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पान 4 वरुन

सहायक पोलिस निरीक्षक मधुसूदन घुगे यांनी संशयित असलेल्या वैभव पटेकर याला ताब्यात घेतले. त्यानंतर पीडिताही नातेवाईकांसह ठाण्यात आली. त्यांनी तक्रार देताच पटेकर याला अटक करण्यात आली.

----------------------------------

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात अध्यक्ष म्हणून बोलत होते. या वेळी जिलहाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आयुक्त जितेंद्र पापळकर म्हणाले, राज्य शासनाने सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि राज्य शासनाच्या समाजोपयोगी योजना सर्वसामान्यातील सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहचविण्यासाठी या शिबिराचे आयोजन केले आहे. शेतकर्यांचा सर्वात मोठा प्रश्न हा पेरणीच्या वेळेस सुरु होतो. बांधावरचे रस्ते, पायवाट यातून भांडणतंटे-वादविवाद सातत्याने दिसून येतात. अशा वेळी राज्य सरकारने शेत पांदणरस्ते सुरु केले आहेत. ते 30 मेपर्यंत पूर्ण करावेत, हे सांगतानाच आयुक्त म्हणाले, जिल्हा प्रशासनानेही गावागावातील प्रश्न तलाठी, सरपंच, प्रतिष्ठीत नागरीक यांच्या सोबत सल्लामसलत करुन तेही मार्गी लावावेत, त्याचबरोबर गावातल्या कुठल्याही व्यक्तीला शासनाच्या योजनेबाबत अथवा अन्य प्रश्नांबाबत थेट जिल्हाधिकारी कार्यालय, अथवा आयुक्त कार्यालयापर्यंत येता येऊ नये, ते प्रश्न तिथले तिथेच सोडवले जावेत यासाठीच या शिबिराचे आयोजन मंडळ स्तरावरील गावांमध्ये केले जात आहे. या शिबिरात संजय गांधी, वारसा हक्काचे फेरफार, जिवंत सातबारा इथपासून आयुष्मान आरोग्य योजना यासह अन्य छोट्यातल्या छोट्या प्रश्नांची सोडवणूक होणार आहे. हे शिबीर आयोजीत करताना आठवडाभरापूर्वी मंडळातील जे काही गावे शिबिराला उपस्थित राहणार आहेत त्या गावच्या सरपंचाने प्रामुख्याने गावातले राजकारण बाजुला ठेवत वस्तूनिष्ठ सर्वसामान्यांचे जे काही प्रश्न असतील, जया काही अडचणी असतील त्या शिबिरात मांडाव्यात. गावकर्यांनीही या शिबिरात तेवढ्याच मोठ्या प्रमाणाने सहभाग नोंदवत आपल्या हक्काच्या योजना आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्नशील रहात आपले प्रश्न या शिबिराच्या माध्यमातून शासन आणि प्रशासन स्तरावर मांडावेत, जर तहसील अथवा जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी हे प्रश्न सोडवत नसतील तर थेट जिल्हाधिकार्यांशी अथवा माझ्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी या वेळी केले. या शिबिरात प्रातिनिधीक स्वरुपात जातीचे प्रमाणपत्र, आयुष्मान आरोग्य कार्ड योजना, गरोदर मातांना आरोग्य किट आदी योजनांतर्गत लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. या वेळी तळेगावच्या सरपंचासह इतर गावचे सपंचही उपस्थित होते. तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे यांच्यासह सर्व खातेप्रमुखांची उपस्थिती होती.

------------------------------

यामध्ये घरगुती वापराचे 17 सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणात पेठ बीड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पेठ बीड पोलिस स्टेशनचे एपीआय नित्यानंद उबाळे यांच्या नेतृत्वाखालील हेड कॉन्स्टेबल नितीन राठोड, पोलिस अंमलदार कल्याण जाधव, अंकुश राठोड, होमगार्ड पठाण ही कारवाई केली. पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, कारकून श्रीराम वायभट व संतोष मुळीक उपस्थित होते.

प्राथमिक तपासात सिलिंडर अनधिकृतपणे भरले गेले असल्याचे निदर्शनास आले असून, लाखो रुपयांचे व्यवहार होत असल्याचा संशय आहे. दरम्यान, घरगुती वापराच्या सिलिंडरचा व्यावसायिक कारणासाठी वापर केला जात असेल तर त्याबाबतची माहिती कळवावी, असे आवाहन तालुका पुरवठा अधिकारी प्रशांत सुपेकर यांनी केले आहे.

--------------------------------------

ठाकरे गट, शिवसंग्राम यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात अलो. या वेळी नितीन सोनवणे, अजय सरवदे, मोरे पाटील, गोरक्षनाथ कदम, रायचंद कापसे, दीपक भालेराव, मयूर निर्मळ, ओमकरे, दिनेश आवळे, अशोक करडे, रवि गायकवाड, बबलू गायकवाड, सिद्धार्थ कानडे, विशाल इंगोले यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

-----------------------------------

सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धा नियमितपणे आयोजित व्हाव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा यांचे मार्गदर्शन लाभले. माजी प्राचार्य रामेश्वर बांगड, उपाध्यक्ष प्रा. कैलास घुगे, प्राचार्य मंगेश काशीद सर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रम सुरळीत पार पाडला. नियोजनबद्ध व्यवस्थापन आणि सर्वांच्या सहकार्यामुळे संपूर्ण कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला.

लवकरच या स्पर्धेतील पंधरा विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. सहभागी सर्व महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या सन्मानामुळे महिलांमध्ये नवचैतन्य आणि प्रेरणा निर्माण होऊन सुसंस्कारित समाज घडविण्यासाठी मदत होईल.

एकूणच, माँसाहेब जिजाऊ यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा आणि स्त्रीशक्तीला नवी दिशा देणारा हा कार्यक्रम सामाजिक बांधिलकी जपत महिलांच्या क्षमतांना वाव देणारा ठरला. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

----------------------------------------

नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत.

दरम्यान,कडा प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा मुख्य रस्ता नाली दुरुस्तीसाठी खोदून ठेवण्यात आल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना दवाखान्यात नेणे कठीण झाले आहे. एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण, असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत.

सध्या दवाखान्यात जाण्यासाठी कडा– धामणगाव मार्गावरुन एकच अरुंद पर्यायी रस्ता उपलब्ध असून तो केवळ एखाद्या कार किंवा पायी जाण्यासाठीच योग्य आहे. त्यामुळे रुग्णवाहिकेलाही दवाखान्यापर्यंत पोहोचणे अवघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर चौपदरीकरणाचे काम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी किमान दवाखान्याकडे जाणारा रस्ता तातडीने मोकळा करुन रुग्णवाहिकेसाठी योग्य व्यवस्था करावी, अशी तीव्र मागणी नागरिकांकडून होत आहे.

---------------------------

महसूल अधिकारी (तलाठी) आशा विजयसिंह काकडे (रा. साबला) या आपल्या कुटुंबासह गेल्या होत्या. दुपारी 2:30 ते 5:30 या वेळेत कथा ऐकत असताना, चोरट्याने त्यांच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण अत्यंत शिताफीने चोरुन नेले. कथा संपल्यानंतर ही बाब त्यांच्या लक्षात आली.

आशा काकडे यांच्या फिर्यादीवरुन केज पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक उपनिरीक्षक प्रल्हाद चव्हाण या प्रकरणाचा तपास करत आहेत. मोठ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये चोरांचे रॅकेट सक्रिय असण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून, महिला भाविकांनी आपल्या दागिन्यांची काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

--------------------------------------------

जिल्हाध्यक्ष ऊसतोड मजूर बीड शो सीता ताई भोसले महिला आघाडी जिल्हाध्यक्ष बीड मा डी डी एस तूप समुद्रे समुद्रे जिल्हा उपाध्यक्ष बीड मा आबासाहेब जावळे जिल्हा संघटक बीड व प्रमुख पदाधिकारी या मेळाव्यासाठी उपस्थित राहणार असून तालुक्यातील तमाम समाज बांधव बहुजन बांधवांनी या शाखा उद्घाटन सोहळ्या व मेळाव्या उपस्थित राहावे असे आव्हान धनवे यांनी केले आहे

----------------------------------------

एप्रिल 2026 रोजी निबंध स्पर्धा सायंकाळी पाच वाजता रमाई सभागृह भीम नगर परळी दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी महिलांसाठी विविध स्पर्धा खेळ सायंकाळी चार वाजता सुगंध कुटी बुद्ध विहार भीम नगर जगतकर गल्ली परळी वैजनाथ दिनांक 12 एप्रिल 2026 सांस्कृतिक कार्यक्रम सायंकाळी पाच वाजता सुगंध कुटी बुद्ध विहार भीम नगर जगतकर गल्ली परळी वैजनाथ व दिनांक 13 एप्रिल 2026 रोजी भव्य आतिश बाजी सायंकाळी 11 वाजून 59 मिनिटात स्थळ सुगंध कुटी बुद्ध विहार भीम नगर परळी वैजनाथ अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या विविध स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त महिला पुरुष व विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा व या स्पर्धेसाठी आकाश साळवे 77 09 46 62 47 / विकास व्हावळे 97 30 40 98 31 / बॉक्सर जगतकर 9403525360 व संकेत बनसोडे 76 20 26 13 46 यांच्याकडे नाव नोंदणी करण्यात यावी असे आवाहन जयंती उत्सव संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे

---------------------------------------------

यांच्याकडे तक्रार करण्यात आली असली, तरी अद्याप संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही किंवा त्यांचा पदभार काढण्यात आलेला नाही, अशी नाराजी शिक्षक संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, 16 मार्च उलटून गेला तरीही शिक्षकांची पेन्शन वितरित झालेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे. एकीकडे शिक्षणाधिकारी विविध दौरे करत असताना दुसरीकडे सेवानिवृत्त शिक्षक मात्र आर्थिक विवंचनेत दिवस काढत आहेत.

पेन्शन न मिळाल्यामुळे अनेक वयोवृद्ध शिक्षकांना औषधोपचार, बँकेचे हप्ते, घरगुती खर्च तसेच मुलांच्या शिक्षणासाठी पैसे उभे करण्याची कसरत करावी लागत आहे. सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरु असल्याने ईदचा खर्चही वाढलेला असून त्यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

या गंभीर परिस्थितीबाबत कास्ट्राईब संघटना व इतर कर्मचारी संघटनांनी वरिष्ठांकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन तातडीने वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

अन्यथा सर्व सेवानिवृत्त कर्मचारी संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

------------------------------------------

पादत्राने रुग्णालय बाहेर सोडतात. याउलट हा नियम फक्त रुग्णांच्या नातेवाईकांसाठी आहे. रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर, नर्स हे पादत्राण्यांसह रुग्णालयात सर्रासपणे फिरताना दिसतात. आजतर अंबाजोगाईच्या एसआरटी रुग्णालयाचे डीन यांनी रुग्णालयाच्या गेटवर सोडलेले अनेक चपला, बुट सुरक्षा रक्षकाच्या माध्यमातून एका पोत्यात भरले आणि घेऊन गेले. उन्हाची तीव्रता वाढत असलयाने प्रत्येकजण पादत्राण्यांशिवाय बाहेर फिरु शकत नाही, डीन यांचा हा आतेताईपणा आणि कर्मचार्याला एक न्याय व नातेवाईकांना दुसरा न्याय यावर संताप व्यक्त केला जात आहे. त्याचबरोबर पादत्राने नेमके कुठे सोडायचे? यबाबत डीन यांनी जागा तरी निश्चित करून द्यावी.




# चूलबंद हॉटेल

शांता : कांता, कुठं चाललीस इतक्या घाईघाईत?

कांता : गॅस सिलिंडरमुळे खूप टेन्शन आलं गं!

शांता : तुझ्याकडे जास्तीचं सिलिंडर नसतं का?

कांता : शेजारच्या बाईला दिलं मी. आता गॅस संपला तर वांदेच... तुझ्याकडे आहे का गं जादाचं एखादं सिलिंडर?

शांता : नाही गं! मी गावी आले त्यासाठी. माहेरी जास्त माणसं. त्यामुळे जादाचं सगळं असतं इकडे. म्हणून मुलांना घेऊन आले माहेरी. चार दिवसांत येईन तिकडे तेव्हा देईन, यांनी घेऊन ठेवलं असेल तर.

कांता : मग मी विचारु का भाऊजींना?

शांता : हे किती चिक्कू! हजार कारणं पुढं करतील. आल्यावर देईन मी. तोपर्यंत चुलीवरचं मटण मिळतं ते हॉटेल आहे की.

कांता : अगं ते हॉटेल बंद आहे चार दिवस. मी आता फ्लॅटमधे चूल मांडायची म्हणते. पहिले दिवस आले गं बाई!

शांता : हो. पण ती चूलबंद असलेली हॉटेलं गॅसवरच चालतात हे समजून जा.

कांता : हो गं! माझ्या हे लक्षातच आलं नाही मेलीच्या!

शांता : चार दिवस शांतच राहिले पाहिजे.

कांता : शांताबाई, तुमच्यासारखं मला माहेरी नाही जाता येणार. कारण माझेच माहेरचे इकडे येणार आहेत.

शांता : छान! काय करणार आता मग? तुला सिलिंडर वाटप कोणी करायला सांगितलं होतं. सरकारी कामाचं खासगीकरण करायला गेलं की असंच होणार. एक वेळ सोनं दे बाई शेजारणीला स्वस्त झालं म्हणून. पण सिलिंडर जपून वापर. ठेवते फोन. काळजी घे. बाय!

कांता : (पुटपुटत) कशाला करायचा बिनकामाचा फोन. जळवायला! चला भंडाऱ्यातच जेवलेलं बरं चूल बंद ठेवून.

शांता : अगं भंडारे पण बंद आहेत. मग कशाला मी आले असते इकडे? फोन कट कर. चालूच आहे. वेंधळा कारभार नुसता. बाय. बंद कर नीट फोन आता तरी.

कांता : तू बंद केलास तरी चालेल. उगाच वाट बघायची कशाला ती. (अचानक काहीतरी आठवून खोट्या सुरात) अगं बाई! तुमचं दार बंद आहे म्हणून सिलिंडर दरवाजात ठेवून उभे आहेत सिलिंडरवाले. मी ठेवून घेते. काळजी नको करू. बरं झालं बाई. सिलिंडर मिळालं. तशी तू गावीच आहेस. तू येईपर्यंत माझे येईल सिलिंडर. चल बाय. थँक्स. फायनली ठेवते फोन.

शांता : अगं ये थांब. कट नको करू. हॅलो... हॅलो...अगं बाई. हिने ठेवला फोन. ट्रम्प, तुला आग लागो लवकर...!

# चीनचा भांडवलप्रवेश

आखातातील भूराजकीय तणाव वाढू लागला आहे. खनिज तेलाच्या तापलेल्या किमती आणि इंधनटंचाईच्या पार्श्वभूमीवर, 'नोमुरा' या जपानच्या ब्रोकरेज फर्मने रिझर्व्ह बँक व्याज दर कपात करण्याची शक्यता फेटाळून लावली आहे. चालू खात्यावरील तूट जीडीपीच्या तुलनेत 1.6 टक्के, तर चलनवृद्धीचा दर 70 आधारबिंदूंनी वाढून साडेचार टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. जेव्हा चलनवाढीचा दर वाढतो, तेव्हा व्याज दर घटण्याऐवजी तो वाढण्याची शक्यता अधिक असते. गॅसच्या तुटवड्यामुळे अनेक हॉटेल्स बंद झाली. होर्मुझची सामुद्रधुनी दीर्घकाळ बंद राहिली, तर तेलाच्या किमती पुन्हा नियंत्रणाबाहेर जाऊ शकतात. जेट इंधनाच्या किमतीत मोठी वाढ झाल्यामुळे हवाई कंपन्यांच्या खर्चात झपाट्याने भर पडत आहे.

विमान प्रवासासाठी आता अधिक पैसे मोजावे लागत आहेत. कच्च्या मालाच्या किमती 30 टक्क्यांनी वाढल्याने औषधांच्या किमतीतही भर पडू शकते. मालवाहतुकीचा खर्च वाढल्याने सर्वच वस्तूच्या किमतींत वाढ झाली. 90 डॉलर प्रतिबॅरलवर कच्च्या तेलाचे दर राहिले, तर किरकोळ महागाई दर 0.8 टक्क्याने वाढण्याची भीती आहे, असे एचडीएफसी बँकेने म्हटले आहे. अर्थात केवळ भारतातच नाही, तर सर्वच देशांत अशाप्रकारची स्थिती आहे. या सर्व प्रतिकूल वातावरणाचा विदेशी गुंतवणुकीसही फटका बसू शकतो. भारताला आपल्या उत्पादन क्षेत्राचा विस्तार करायचा असल्यामुळे आणि पुरवठासाखळीत खंड पडू नये यासाठी संकटातूनही मार्ग काढावा लागणार आहे. केंद्र सरकारने चीनसह शेजारी राष्ट्रांतून थेट विदेशी गुंतवणुकीसंदर्भात (एफडीआय) नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विशेषतः चीनमधून होणाऱ्या गुंतवणुकीवर गेल्या काही वर्षांपासून लागू असलेले निर्बंध हटवले जाणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. भारताची सीमा भिडलेल्या देशांमध्ये चीन, बांगला देश, पाकिस्तान, भूतान, नेपाळ, म्यानमार आणि अफगाणिस्तानचा समावेश आहे. यापूर्वी पाकिस्तान आणि बांगला देश या दोन शेजारी राष्ट्रांसाठी एफडीआयसंदर्भात सरकारी परवानगीचा नियम होता. कोरोनाकाळात यात चीनचाही समावेश करण्यात आला. एप्रिल 2000 ते डिसेंबर 2025 या काळात भारतात झालेल्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीच्या प्रवाहात चीनचा वाटा 2.91 अब्ज अमेरिकी डॉलर म्हणजे गुंतवणुकीच्या 0.32 टक्के इतका होता. जून 2020 मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या भीषण चकमकीनंतर भारत-चीन संबंध बिघडले. त्यानंतर भारताने टिकटॉक, वीचॅट आणि अलिबाबाच्या यूसी ब्राऊझरसारख्या दोनशेहून अधिक चिनी मोबाईल ॲप्सवर बंदी घातली आणि चीनमधून भारतात होणाऱ्या गुंतवणुकीवरही निर्बंध घातले. त्यामुळे तेथून येणाऱ्या एफडीआयमध्ये घट झाली.

मोठ्या प्रमाणात येणारी 'एफडीआय' ही स्वयंचलित मंजुरीच्या म्हणजेच ऑटोमॅटिक रूटने येते. गेल्या काही वर्षांत एफडीआयला प्रोत्साहन देण्यासाठी नियम सैल करण्यात आले. काही क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारच्या मंजुरीविना परदेशी कंपन्यांना भारतीय कंपन्यांमध्ये थेट गुंतवणूक करता येते. मात्र संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान, दूरसंचार, औषधनिर्मिती, अणुऊर्जा आदी 17 क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारच्या परवानगीशिवाय थेट गुंतवणूक करता येत नाही. चीनसारख्या शेजारी राष्ट्राकडून अडचणीच्या काळात मोका साधून भारतीय कंपन्यांचा ताबा घेतला जाऊ नये, यासाठी कोरोनाकाळात त्या देशातून येणाऱ्या गुंतवणुकीला पूर्वपरवानगी नियम लागू करण्यात आला होता. आता हे निर्बंध मागे घेण्यात आले असल्यामुळे चीनमधील एफडीआय अधिक प्रमाणात येईल आणि त्यामुळे विविध क्षेत्रांतील उत्पादनही वाढेल. हे उत्पादन काही प्रमाणात निर्यातही करता येईल. यामुळे रोजगारनिर्मितीस चालना मिळू शकेल. अर्थात गेल्या पाच वर्षांत चीनमधून येणाऱ्या विदेशी भांडवलाची आवक घटली असली तरी त्या देशाशी व्यापार प्रचंड प्रमाणात वाढला. चीन हा भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनलेला आहे.

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
सोमवार दि. 16 मार्च 2026


# संतापजनक! अल्पवयीन विवाहितेचे अपहरण करून अत्याचार; नंतर गावच्या चावडीत आणून बांधले!



बीड - तालुक्यातील एका गावात माणुसकीला काळिमा फासणारी संतापजनक घटना समोर आली आहे. एका अल्पवयीन विवाहितेचे राहत्या घरातून अपहरण करून तिच्यावर अत्याचार करण्यात आला, इतकेच नव्हे तर अत्याचारानंतर पीडितेला गावच्या चावडीत बांधून ठेवून आरोपी फरार झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पीडित महिला 10 मार्च रोजी रात्री आपल्या पतीसोबत घरात झोपलेली असताना ही घटना घडली. रात्रीच्या सुमारास आरोपीने घरात शिरून पीडितेचे तोंड दाबले आणि तिला उचलून गावातील नदीपात्रात नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करण्यात आला. क्रूरतेचा कळस म्हणजे, या कृत्यानंतर आरोपीने पीडितेला गावातील चावडीत आणून बांधून ठेवले आणि तो तेथून पसार झाला

सकाळी शुद्धीवर आल्यावर पीडितेने मदतीसाठी याचना केली. मात्र सुरुवातीला तिला कोणाकडूनही दाद मिळाली नाही. नंतर नातेवाईकांनी तिला मुक्त करून घरी नेले. आरोपीच्या भीतीपोटी पीडितेने दोन दिवस ही घटना गुपित ठेवली होती. अखेर, धैर्य एकवटून पीडितेने आई व मामासोबत पिंपळनेर पोलिस ठाणे गाठून वैभव पटेकर या व्यक्तीविरोधात तक्रार दिली आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलिस आणि पिंक पथक तपास करत आहेत. या प्रकरणाचा व्हिडिओ पिंपळनेर परिसरात व्हायरल झाला होता. याची माहिती मिळताच पिंपळनेर पोलिस ठाण्याचे पान 3 वर

# सरपंचांनो, पक्षीय भेदाभेद बाजुला ठेवाशासनाच्या सर्व योजना प्रत्येकापर्यंत जाऊद्या

## » प्रशासनातील अधिकारी कामचुकारपणा करत असतील तर माझ्याशी संपर्क साधा -आयुक्त पापळकर




बीड : गावागावातले प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि राज्य शासनाच्या योजना थेट लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सरकारने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' मंडळ स्तरावर घेण्याचे योजिले आहे. गावातल्या सरपंचांनी कुठलाही पक्षीय भेदाभेद न ठेवता आपल्या गावातल्या प्रत्येक अडचणी त्याचबरोबर सत्ताधारी-विरोधक असलेल्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी या शिबिराचा उपयोग करून घ्यावा, जर कुठे सर्वसामान्य नागरिकांना अडचणी येत असतील तर त्यांनी थेट जिल्हाधिकार्यांशी अथवा माझ्याशी संपर्क साधावा, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.

ते आज बीड तालुक्यातील तळेगाव या ठिकाणी आयोजीत पान 3 वर

# बीडमध्ये सिलिंडरचा काळा बाजार

## पोलिस व महसूलच्या कारवाईत साठेबाजी उघड; 29 गॅस टाक्या जप्त



बीड : जिल्ह्यात गॅस काळ्या बाजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी पेठ बीड पोलिस स्टेशन हद्दीतील इमामपूर रोडवरील शिवनेरी नगर परिसरात शुक्रवारी मध्यरात्री वाजता छापा टाकला असता 29 वेगवेगळ्या कंपनीच्या (इंडेन, भारत गॅस, एचपी) टाक्या आढळल्या. यापैकी 12 व्यावसायिक वापराच्या सिलिंडरांपैकी 1 भरलेला आणि 17 घरगुती सिलिंडरांपैकी 8 भरलेले सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईत पोलिसांनी तब्बल 73 हजार 550 रुपयांच्या सिलिंडर जप्त केले आहेत.

बीड शहरातील इमामपूर रोडवरील शिवनेरी नगर भागात घरगुती गॅसचा अवैध साठा केला असल्याची माहिती पेठ बीड पोलिस व महसूलच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार शुक्रवारी पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास पोलिस आणि पुरवठा विभागाने संयुक्त कारवाई केली. पान 3 वर

# महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या या मागणीसाठी आज तहसील कार्यालयावर धरणे



परळी प्रतिनिधी. जगातील तमाम बौद्धांचे पवित्र स्थान असलेले बिहार मधील गया येथे असणारे महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या या मागणीसाठी सूर्यप्रकाश फाऊंडेशन व समस्त बौद्ध बांधवांच्या वतीने आज दिनांक 16 मार्च रोजी परळी वैजनाथ तहसील कार्यालयावर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे सूर्यप्रकाश फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रकाशसिंग तुसाम यांनी दिली आहे.

याबाबत तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बौद्ध गया येथे असणारे महाबोधी महाविहार हे संपूर्ण जगातील बौद्ध धर्मीयांचे श्रध्दास्थान आहे.जगभरातून बौद्ध उपासक उपासिका येथे भेट देत असतात. या विहाराच्या ट्रस्टीवर ब्राह्मण समाजाचे सदस्य आहेत त्यांना काढून टाकावे व बी.टी. अक्ट 1949 बिहार सरकारने रद्द करावा. यासाठी आज दिनांक 16 मार्च रोजी होत असलेल्या एक दिवसीय धरणे आंदोलनात बौद्ध बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रकाशसिंग तुसाम यांनी केले आहे.

# गॅसची टंचाई : नेकनूरमध्ये रास्ता रोकोघोषणांनी नेकनूर दणाणले




देशात सध्या गॅसची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांची होरपळ होऊ लागली. महागाई मोठ्या प्रमाणात

नेकनूर : केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे सर्वसामान्य जनतेची होरपळ होत असून सध्या गॅसची टंचाई निर्माण होत आहे. शासनाच्या निषेधार्थ काल नेकनूर येथे विविध पक्ष-संघटनांच्या वतीने बसस्थानकासमोरर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये अनेकांची उपस्थिती होती.

वाढली असून केंद्र सरकारच्या निषेधार्थ काल ऑल इंडिया पँथर सेना, वंचित बहुजन आघाडी, शिवशक्ती-भीमशक्ती, शिवसेना पान 3 वर

# माँसाहेब जिजाऊंच्या विचारांनी प्रेरित महिलांसाठी विशेष स्पर्धा उत्साहात संपन्न




**परळी/ प्रतिनिधी**

स्त्रीशक्ती, संस्कार आणि नेतृत्वगुणांची प्रेरणा देणाऱ्या माँसाहेब जिजाऊ यांच्या विचारांचा जागर प्रसार व्हावा आणि महिलांमध्ये आत्मविश्वास व कर्तृत्वाची जाणीव अधिक दृढ व्हावी या उद्देशाने महिलांसाठी आयोजित करण्यात आलेली विशेष स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक मूल्यांचा संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम महिलांसाठी प्रेरणादायी ठरला. जागतिक महिला दिनानिमित्ताने परळी येथे 'कोण ठरणार परळीची माँसाहेब जिजाऊ' या विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे आयोजन माऊंट लिटरा झी स्कूल, बचपन प्ले स्कूल, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अकॅडमी आणि क्रिएटिव्ह किड्स एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात माँसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. जिजाऊंच्या आदर्श जीवनकार्याची आठवण करून देत महिलांनी समाजनिर्मितीत आपली भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडावी, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. स्पर्धेमध्ये विविध वयोगटातील महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. रांगोळी स्पर्धा, कथा, प्रश्नमंजुषा, कलात्मक सादरीकरण, व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित उपक्रम तसेच सांस्कृतिक स्पर्धांमधून सहभागी महिलांनी आपले कौशल्य आणि सर्जनशीलता प्रभावीपणे सादर केली.

विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांनी जिजाऊंच्या विचारांना साजेशी कल्पकता आणि सामाजिक भान आपल्या कलाकृतींमधून व्यक्त केले. रंगीबेरंगी रांगोळ्या, प्रेरणादायी संदेश आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक दर्शविणाऱ्या कलाकृतींनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना स्वतःची कला सादर करण्याची संधी मिळालीच, शिवाय परस्परांमध्ये संवाद, सहकार्य आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे सहभागी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि आनंदी वातावरण. उपस्थितांनी महिलांच्या आत्मविश्वासपूर्ण सहभागाचे कौतुक करत अशा उपक्रमांची समाजाला मोठी गरज असल्याचे मत व्यक्त केले. महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या पान 3 वर

# नालीकरणामुळे रुग्णांची गैरसोय; प्राथमिक आरोग्य केंद्राचा रस्ता खोदल्याने अडचणी...

## • एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण, असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत



कडा : आष्टी तालुक्यातील साबलखेड ते चिंचपूर या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांच्या व ठेकेदारांच्या मनमानीमुळे कासवगतीने सुरु आहे. त्यातच कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा रस्ता नाली दुरुस्तीच्या कामासाठी मागील आठ दिवसांपासून खोदून ठेवण्यात आल्याने रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना रुग्णवाहिकेद्वारे सरकारी दवाखान्यात कसे न्यायचे, असा प्रश्न नागरिकांपुढे निर्माण झाला आहे.

आष्टी तालुक्यातील नगर–बीड महामार्गावरील साबलखेड ते चिंचपूर या मार्गाचे चौपदरीकरणाचे काम मागील साडेतीन वर्षांपासून सुरु असूनही ते अद्याप अर्धवट अवस्थेत आहे. महामार्ग विभाग व संबंधित ठेकेदारांच्या हलगर्जीपणामुळे काम संथ गतीने सुरु असून, या मार्गावर उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील व्यावसायिक व पान 3 वर

# "रामकथा ऐकतानाच डल्ला!"; गर्दीचा फायदा घेत चोरट्याने महिला तलाठ्याचे सोन्याचे गंठण पळवले



चोरट्याने लंपास केले आहे. गर्दीचा फायदा घेत गुरुवारी दुपारी ही चोरी करण्यात आली असून, याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गर्दीत चोरट्याने साधली संधी

केज (जि. बीड): तालुक्यातील टाकळी फाटा येथे आयोजित संगीत रामकथा ऐकण्यासाठी गेलेल्या एका महिला तलाठ्याच्या गळ्यातील 2 लाख 37 हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण अज्ञात

टाकळी फाटा येथे हभप रामायणाचार्य रामराव महाराज ढोक (नागपूरकर) यांची संगीत रामकथा आयोजित करण्यात आली आहे. या कथेसाठी ग्राम पान 3 वर

# रिपाई एकतावादी. एकतावादी चे मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांच्या उपस्थितीत शाखा उद्घाटन सोहळा व मेळावा

## मेळाव्यास बहुजन बांधवांनी बहुसंख्येने राहावे.. धनवे



बीड वार्ता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी राष्ट्रीय नेते नानासाहेब इंदिसे या पक्षाचा शाखा उद्घाटन सोहळा व मेळावा रिपाईचे मराठवाडा अध्यक्ष मा शैलेंद्र पोटभरे यांच्या उपस्थितीत मोजे गोमळवाडा सिंफना शिरूर जिल्हा बीड येथे दिनांक 18 बुधवार रोजी सायंकाळी पाच वाजता आयोजित केला असून या मेळाव्यास तालुक्यातील बहुजन बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान मेळाव्याचे आयोजक शहादेव दादा धनवे यांनी केले आहे. या मेळाव्यास प्रमुख



उपस्थिती. मा पंडितराव झिंजुर्डे राज्यसचिव रिपाई मा संजय भद्रे जिल्हाध्यक्ष बीड मा मधुकर धनवे पान 3 वर

# परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली प्रबुद्ध नगर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भीम महोत्सवाचे आयोजन



परळी प्रतिनिधी = परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली प्रबुद्ध नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने भिम महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त सुगंध कुटी बौद्ध विहार भीम नगर जगतकर गल्ली प्रबुद्ध नगर जयंती उत्सव समितीच्या वतीने दिनांक 5 एप्रिल ते 13 एप्रिल पर्यंत भीम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून यात दिनांक 5 एप्रिल 2026 रोजी 12 तास सकाळी आठ ते सायंकाळी आठ अभ्यास अभियान. दिनांक 6 एप्रिल 2026 रोजी संगीत खुर्ची सायंकाळी पाच वाजता सुगंध कुटी बुद्ध विहार भीम नगर जगतकर गल्ली दिनांक 7 एप्रिल सामान्य ज्ञान स्पर्धा सायंकाळी पाच वाजता रमाई सभागृह भीम नगर जगतकर गल्ली दिनांक 8 एप्रिल 2026 रोजी रांगोळी स्पर्धा सायंकाळी पाच वाजता रमाई सभागृह भीम नगर परळी वैजनाथ दिनांक 9 एप्रिल 2026 रोजी चित्रकला स्पर्धा सायंकाळी पाच वाजता स्थळ रमाई सभागृह भीम नगर परळी वैजनाथ दिनांक दहा पान 3 वर

# शिक्षण अधिकाऱ्यांच्या आडमुठपणामुळे शिक्षकांची पेन्शन रखडली; सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक संकटात – सूर्यकांत जोगदंड




बीड (प्रतिनिधी) – शासनाच्या स्पष्ट निर्देशानुसार सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन दर महिन्याच्या एक तारखेलाच वितरित करणे बंधनकारक असताना, बीड जिल्ह्यात मात्र प्रशासनाच्या हलगर्जीपणा आणि आडमुठ्या कारभारामुळे अनेक शिक्षकांना अद्याप पेन्शन मिळालेली नाही. परिणामी जिल्ह्यातील वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक संकटात सापडले असून त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेन्शनचे बजेट 18 फेब्रुवारी रोजी उपलब्ध झाले होते, मात्र प्रभारी शिक्षणाधिकारी श्रीमती कुवर यांच्या टेबलवर पेन्शनची फाईल तब्बल आठ दिवस पडून राहिली. या काळात संबंधित फाईलवर स्वाक्षरी करण्यात आली नसल्याने शिक्षकांची पेन्शन प्रक्रिया ठप्प झाली. याबाबत शिक्षकांनी विचारणा केली असता त्यांच्याशी अरेरावी केल्याचाही आरोप पुढे येत आहे.

या प्रकरणी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पान 3 वर

# डीन' महोदय रुग्णांच्या नातेवाईकांनी चपला कुठे ठेवायच्या?

## एसआरटी बाहेर ठेवलेल्या चपला सुरक्षा रक्षकांनी पोत्यात भरल्या



अंबाजोगाई : येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या डीन यांनी अजब फतवा काढल्याचे निदर्शनास येत असून रुग्णालयात येणार्या रुग्णांच्या नातेवाईकांनी पादत्राने घालून येऊ नये या आदेशाचे तंतोतंत पालन नातेवाईकांनी केले, रुग्णालयाच्या बाहेर गेटवर त्यांनी पादत्राने सोडले, मात्र डीन यांनी सुरक्षा रक्षकांना सांगून या सर्व नातेवाईकांची पादत्राने एका पोत्यात भरुन जप्त केल्याचे समोर आले आहे. रुग्णालयातील कर्मचारी पादत्रान्यांसह रुग्णालयात प्रवेश करतात मात्र नातेवाईकांना पादत्राने विना प्रवेश करण्याच्या सूचना दिल्या जातात. पादत्राने बाहेर सोडले तर तेही उचलून नेले जातात. यामुळे सर्वसामान्यांत संताप व्यक्त केला जात आहे.

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयामध्ये रुग्णांना भेटीसाठी येणार्या नातेवाईकांनी पादत्राने बाहेर सोडावेत, अशा सूचना संबंधित डीनने दिल्या. त्यानुसार नातेवाईक हे आपले पान 3 वर